शनिवार, दि. ७ फेब्रुवारी २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १५९ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

[illegible] हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# पत्रकारास जीवे मारण्याची धमकी देणाऱ्यावर पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी

## प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र जालना जिल्ह्याच्यावतीने पोलीस अधिक्षकांना निवेदन

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हा परिषदेतील बांधकाम विभागात सहाय्यक लेखाधिकारी यांच्या कॅबिनमध्ये बसलेले पत्रकार भरत मानकर यांना सोमवार (दि. २) रोजी दुपारी १ ते दीड वाजेच्यादरम्यान एका शासकीय गुत्तेदाराचा भाऊ श्री बांगड यांने अर्वाच्च्य भाषेत शिवीगाळ केली, धक्काबुक्की करुन जीवे मारण्याची धमकी दिली या प्रकरणी तात्काळ पत्रकार संरक्षण कायद्यातंर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र जालनाच्यावतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात पोलीस अधिक्षकांना निवेदन देण्यात आले असून येत्या आठ दिवसांत कारवाई न झाल्यास १६ फेब्रुवारीपासून लक्षवेधी आंदोलन करण्याचा ईशाराही देण्यात आला आहे.

पोलीस अधिक्षकांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सोमवार, दि. २ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी १ ते १.३० वाजेच्या दरम्यान तक्रारदार भरत गणपतराव मानकर, संपादक दैनिक जनश्वास, रा. विद्युत नगर जालना. हे बातमीच्या अनुषंगाने माहिती घेण्यासाठी जिल्हा परिषद बांधकाम विभाग येथील सहाय्यक लेखाधिकारी श्री हारुण यांच्या कॅबिनमध्ये बसलेले असतांना तेथे श्री. बांगड नावाचे गुत्तेदार आले व त्यांनी कोण मादर.. पत्रकार है, अशा गलिच्छ-अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करुन आमचे कामाचे देयक रोखण्याचा प्रयत्न करतो, त्याचे हातपाय तोडून टाकू, त्याला लय मस्ती आली. तो विनाकारण आमच्या कामाबद्दल माहिती घेऊन बातमी छापण्याचा प्रयत्न करत आहे. अशा पद्धतीने बोलून तेथे पत्रकार भरत मानकर यांना धक्काबुक्की करण्यात आली. व जीवे मारण्याची धमकी दिली. या श्री बांगड नावाच्या गुत्तेदारापासून भरत मानकर यांच्या जीवीतास धोका निर्माण झालेला आहे. तरी संबंधीत गुत्तेदारावर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यासह पत्रकार संरक्षण कायद्यातंर्गत गुन्हा दाखल करण्यात यावा. व भरत मानकर यांना संरक्षण देण्यात यावे. यासंदर्भात पत्रकार भरत मानकर यांनी कदीम जालना पोलीस ठाण्यात रितसर तक्रार दिली आहे. अद्यापपर्यंत या तक्रारीची संबंधीत पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांनी दखल घेतली नाही. व आजपावेतो गुन्हा दाखल करण्यात आला नाही. त्यामुळे पोलीस अधीक्षकांनी तक्रारीची गांभीर्याने दखल घेऊन तत्काळ पत्रकार संरक्षण कायद्यातंर्गत गुन्हा दाखल करावा अन्यथा येत्या १६ फेब्रुवारीपासून आपल्या कार्यालयासमोर लक्षवेधी आंदोलन करण्याचा ईशारा निवेदनाच्या शेवटी देण्यात आला आहे. यानिवेदनावर प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्रचे जालना जिल्हाध्यक्ष दीपक शेळके, भरत मानकर, लियाकत अली खान यासीर, सदानंद देशमुख, आमेर खान, अच्युत मोरे, विष्णु कदम, संतोष भुतेकर, शेख सलीम, राहुल मुळे, संदीप भाकरे, काकासाहेब कासार, सचिन सर्वे, आरेफ सय्यद, शेख शकील, योगेश काकफळे, संतोष जाधव आदी पत्रकारांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



जालना महानगरपालिका

## पहिल्या महापौरपदी भाजपच्या वंदना मगरे तर उपमहापौरपदी राजेश राऊत!





**जालना । प्रतिनिधी -** जालना नगरपालिकेचे महानगरपालिकेत रूपांतर झाल्यानंतर झालेल्या पहिल्याच निवडणुकीत भाजपने एकहाती सत्ता मिळवत इतिहास रचला आहे. जालना महानगरपालिकेच्या पहिल्या महापौरपदी भाजपच्या वंदना मगरे तर उपमहापौरपदी राजेश राऊत यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला आहे. मगरे आणि राऊत यांची बिनविरोध निवड होण्याची चिन्हे आहेत.

महानगरपालिकेच्या ६५ जागांपैकी ४१ जागांवर विजय मिळवत भाजपने स्पष्ट बहुमत प्राप्त केले. या पार्श्वभूमीवर महापौर व उपमहापौर पदांवर भाजपचेच उमेदवार निश्चित झाले. माजी आमदार कैलास गोरंटयाल यांच्या कट्टर समर्थक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वंदना मगरे यांच्यावर पक्षाने विश्वास टाकत महापौरपदाची जबाबदारी सोपवली आहे.

महापौर आणि उपमहापौर या दोन्ही पदांचा कार्यकाळ १५ महिन्यांचा असणार आहे. वंदना मगरे आणि राजेश राऊत यांच्या नावांची शिफारस माजी आमदार कैलास गोरंटयाल तसेच भाजप महानगराध्यक्ष भास्कर दानवे यांनी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली होती. त्या शिफारशीनुसार दोन्ही पदांसाठी उमेदवारी निश्चित करण्यात आली. महापौर पदासाठी वंदना मगरे व उपमहापौर पदासाठी राजेश राऊत यांनी अर्ज दाखल केले. त्यांच्या विरोधात कोणताही अर्ज दाखल न झाल्याने दोघांचीही निवड बिनविरोध झाल्याचे स्पष्ट झाले आहे. जालना महानगरपालिकेच्या महापौर व उपमहापौर पदासाठीची अधिकृत निवडणूक प्रक्रिया ९ फेब्रुवारी रोजी पार पडणार असून, त्या दिवशी या निवडीची औपचारिक घोषणा होण्याची शक्यता आहे.

युवा आदर्श

## माई ...

रमाई बाबासाहेबांची
ती सार्थ सहचारिणी
आगळी सहगामिनी
सदैव राहील स्मरणी
अर्ध पोट कधी उपाशी
तरीही न डोळापाणी
फुलवले वाचनालय
पुस्तकाची पुष्करणी
कष्ट मय जीवन व्यते
करी गोवऱ्या थोपणी
बाबांना देण्या दिशा
स्वत: बंदिस्त कुंपणी
अदृश्य लढा माईंचा
खरोखर रण रागिणी
भीमराव दिले देशा
राही तव सदैव ऋणी
निळा सूर्य चमकता
दुरूनि पाहते चांदणी
गरीब जरी श्रीमंत ती
माणीक शोभे कोंदणी
विद्वत्ताप्रचूर भिमराव
भार्या तितकी सद्गुणी
आगळे अद्भुत दांपत्य
आठवेल रे क्षणोक्षणी

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# भारत विश्वविजेता!

## वैभव सूर्यवंशीचे तुफान

### इंग्लंडचा धुव्वा उडवत भारताने सहाव्यांदा कोरलं विश्वचषकावर नाव






**हरारे -** हरारेच्या मैदानावर भारताच्या अंडर-१९ संघाने इतिहासाची पुनरावृत्ती केली. आयसीसी पुरुष-१९ वर्षांखालील विश्वचषक २०२६ च्या अंतिम सामन्यात भारताने इंग्लंडवर तब्बल १०० धावांनी दणदणीत विजय साकारत सहाव्यांदा विश्वविजेतेपदावर आपले नाव कोरले. वैभव सूर्यवंशीच्या विक्रमी आणि वादळी १७५ धावांच्या खेळीमुळे भारताने ४१२ धावांचा डोंगर उभा केला, ज्यापुढे इंग्लंडचा संघ पुरता कोसळला. लक्ष्याचा पाठलाग करताना इंग्लिश फलंदाज अपयशी ठरले आणि संपूर्ण संघ ३१२ धावांत गारद झाला. या विजयासह भारताने सहाव्यांदा (२०००, २००८, २०१२, २०१८, २०२२ आणि २०२६) विश्वविजेतेपदाचा चषक उंचावून नवा इतिहास रचला आहे.

भारताच्या डावाची सुरुवात वैभव सूर्यवंशी आणि आरोन जॉर्ज यांनी केली. मात्र सुरुवातीलाच भारताला धक्का बसला. आरोन जॉर्ज अवघ्या ९ धावांवर बाद झाला. त्यानंतर कर्णधार आयुष म्हात्रेने डाव सावरत जबाबदारीने खेळ केला. आयुषने ५१ चेंडूत ७ चौकार आणि २ षटकारांसह ५३ धावांची महत्त्वपूर्ण अर्धशतकी खेळी साकारली.

यानंतर भारताकडून वैभव सूर्यवंशीने अक्षरशः धुमाकूळ घातला. त्याने अवघ्या ३२ चेंडूत अर्धशतक पूर्ण केले आणि ५५ चेंडूत शानदार शतक झळकावले. वैभवने फक्त ७१ चेंडूत १५० धावांचा टप्पा ओलांडत प्रेक्षकांना थक्क केले. अखेर त्याने ८० चेंडूत १५ चौकार आणि १५ षटकारांच्या मदतीने १७५ धावांची अफलातून खेळी केली. या डावात त्याचा स्ट्राईक रेट तब्बल २१८.७५ इतका होता.

वैभव बाद झाल्यानंतर भारतीय डावाचा वेग काहीसा मंदावला. त्यानंतर विहान मल्होत्राने ३६ चेंडूत २ चौकारांसह ३० धावा करत योगदान दिले. वेदांत त्रिवेदीनेही ३६ चेंडूत ३ चौकारांसह ३२ धावांची उपयुक्त खेळी केली. अभिज्ञान कुंडूने आक्रमक खेळ करत ३१ चेंडूत ६ चौकार आणि १ षटकाराच्या मदतीने ४० धावा केल्या. याशिवाय आर. एस. अंबरीशने १८, खिलेन पटेलने ३, हिनेल पटेलने ५ धावा केल्या, तर कनिष्क चौहान नाबाद ३७ धावांवर राहिला. इंग्लंडकडून जेम्स मिंटोने सर्वाधिक ३ विकेट घेतल्या. त्याला एलेक्स ग्रीन आणि सेबस्टियन मॉर्गन यांनी प्रत्येकी २ विकेट घेत चांगली साथ दिली.

४१२ धावांच्या विशाल लक्ष्याचा पाठलाग करताना इंग्लंडची सुरुवात अत्यंत खराब झाली. भारताच्या भेदक गोलंदाजीसमोर इंग्लंडचे फलंदाज ठराविक अंतराने बाद होत गेले. इंग्लंड संघ ४०.२ षटकांत ३११ धावांवर गारद झाला. वैभव सूर्यवंशी हा टीम इंडियाचा अंतिम सामन्याचा स्टार होता, त्याने फक्त ८० चेंडूत १७५ धावा केल्या. दरम्यान, इंग्लंडकडून कॅलेब फॉकनरने शतक झळकावले, परंतु तो आपल्या संघाला विजय मिळवून देऊ शकला नाही. फॉकनरने ६७ चेंडूत ११५ धावा केल्या.

## लाडक्या बहिणींना ३१ मार्च पर्यंत मुदतवाढ

**मुंबई -** महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी मोठी घोषणा केली आहे. ज्या लाडक्या बहिणींची ई-केवायसी प्रक्रिया चुकली असेल त्यांनी ३१ मार्च२०२६ पर्यंत दुरुस्ती करुन घ्यावी, असं आवाहन त्यांनी केलं आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांना ई केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्यास ३१ डिसेंबर २०२५ ची मुदत देण्यात आली होती. त्या दरम्यान महिलांकडून काही चुकीचे पर्याय निवडले गेल्यानं त्यांचा लाभ बंद झाला होता. आता राज्य सरकारनं पुन्हा एकदा ई- केवायसी दुरुस्तीसाठी संधी उपलब्ध करुन दिली आहे. केवायसी प्रक्रिया करताना काही लाभार्थ्यांकडून चुकीचा पर्याय निवडला गेल्याने योजनेचा लाभ मिळण्यात अडचणी येत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. विशेषतः ज्या पात्र लाभार्थ्यांनी - करूनही त्यांना अद्याप योजनेचा लाभ मिळालेला नाही, अशा सर्व बहिणींना आपली - माहिती दुरुस्ती करण्यासाठी पुन्हा एकदा संधी देण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर, ऑनलाइन पोर्टलच्या माध्यमातून दिनांक ३१ मार्च २०२६ पर्यंत केवायसीमध्ये दुरुस्ती करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. सर्व पात्र लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळावा हीच महिला व बालविकास विभागाची प्रामाणिक भूमिका आहे. म्हणूनच, ज्या लाडक्या बहिणींच्या ईकेवायसी प्रक्रियेत काही चूक झाली आहे, त्यांनी मुदतीपूर्वी दुरुस्ती करून घ्यावी


## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे वाढदिवस साजरा करणार नाही

**मुंबई । प्रतिनिधी -** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे महाराष्ट्रावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यामुळे यंदा ९ फेब्रुवारी रोजी वाढदिवस साजरा न करण्याचा निर्णय राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला आहे. पुष्पगुच्छ, भेटी आणू नयेत, शुभेच्छा देणारे होर्डिंग्ज लावू नये, तसेच वाढदिवसानिमित्ताने कोणताही सोहळा आयोजित करू नये, असे आवाहन एकनाथ शिंदे यांनी केले आहे. अजित दादांच्या अकाली जाण्याच्या वेदनेतून महाराष्ट्र आजही सावरलेला नाही. व्यक्तिशः मी माझा सहकारी आणि मित्र गमावला आहे. दादांच्या निधनाने झालेली अपरिमित हानी भरून येणारी नाही. पवार कुटुंबाच्या दुःखात आपण सहभागी आहोत.

अशा या दुःखद परिस्थितीत वाढदिवस साजरा करणे, सोहळे-समारंभ करणे मला उचित वाटत नाही. त्यामुळेच परिस्थितीचे गांभीर्य आपण जपू या असे आवाहन श्री. शिंदे यांनी केले आहे. माझ्या वाढदिवसानिमित्ताने कुणीही पुष्पगुच्छ आणू नयेत, होर्डिंग्स लावू नयेत, तसेच कोणताही समारंभ, कार्यक्रम आयोजित करू नयेत, अशी विनंती उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी केली आहे.

संपादकीय पान

# हिमालयाची सावली



भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी रमाई यांची जयंती. ७ फेब्रुवारी १८९७ रोजी माता रमाई यांचा जन्म एका गरीब कुटूंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव भिकू धोत्रे ( वलंगकर ) तर आईचे नाव रुक्मिणी असे होते. दाभोळजवळील वनंदगावात नदीकाठी महारपुरा वस्तीमध्ये त्या राहत होत्या. त्यांना तीन बहिणी व एक भाऊ होता. त्यांचे वडील दाभोळ बंदरात माशांनी भरलेल्या टोपल्या पोहचवत असत. रमाई लहान असतानाच त्यांच्या आईचे निधन झाले. काही दिवसांनी वडिलांचेही निधन झाले. लहान वयातच आई वडिलांचे छत्र हरपल्याने कोवळ्या रमाईच्या मनावर मोठा आघात झाला. आई वडिलांविना पोरक्या झालेल्या या भावंडांना वलंगकर काका व गोविंदपूरकर मामा यांनी मुंबईला आणले. मुंबईतील भायखळा मार्केटच्या चाळीत ते राहू लागले. त्याच सुमारास सुभेदार रामजी आंबेडकर हे आपल्या भीमरावसाठी मुलगी पाहत होते. वलंगकारांकडे लग्नाची मुलगी असल्याचे त्यांना समजले. सुभेदार रामजी आंबेडकर यांनी रमाईला पाहिले. रमाईला पाहता क्षणिच सुभेदाराने तिला आपल्या भीमरावासाठी पसंत केली. रमाई आणि भीमराव यांचा भायखळ्याच्या मार्केटमध्ये विवाह झाला. विवाहाप्रसंगी बाबासाहेबांचे वय चौदा तर रमाईचे वय नऊ वर्ष होत. त्यावेळी बाल विवाहाची प्रथा समाजात रूढ होती. लग्नात पंच पक्वान्ने नव्हती. झगमग रोषणाई नव्हती. अतिशय साध्या पद्धतीने हा विवाह पार पडला. माता रमाईला जीवनात अनेक दुःखे सहन करावी लागली. १९२३ साली बाबासाहेब लंडनला गेले. त्यावेळी रमाईची खुप वाताहत झाली. ती दुष्काळाच्या आगीत होरपळत होती. बाबासाहेबांच्या कार्यकर्त्यांना त्यांचे हाल पहावले नाही त्यांनी काही पैसे जमा केले व ते पैसे रमाईला देऊ केले. त्यांनी कार्यकर्त्यांच्या भावनांचा आदर केला मात्र पैसे स्वीकारण्यास नम्रपणे नकार दिला. रमाई या बाबासाहेबांप्रमाणेच स्वाभिमानी होत्या. माता रमाई या आयुष्यभर दुःखाशी, गरीबीशी जिद्दीने झगडत होत्या मात्र हार मानत नव्हत्या. मृत्यूसत्र, दुःख, त्याग, समजूतदारपणा , कारुण्य, उदंड मानवता आणि मृत्यू यांचे सर्जनशील ज्वलंत प्रेरणास्थान म्हणजे माता रमाई. रमाईने अनेक दुःखे झेलली. त्यांच्या इतके मरण कोणीही पाहिले नसेल. लहान वयातच आई वडिलांचा मृत्यू, १९१३ साली सासरे शुभेदार रामजी आंबेडकर यांचा मृत्यू, बाबासाहेबांचे मोठे बंधू आनंदराव, त्यांचा मुलगा गंगाधर यांचा मृत्यू, १९२१ साली बाबासाहेबांचा मुलगा बाळ गंगाधर, १९२६ मध्ये राजरत्न असे अनेक मृत्यू त्यांनी पाहिले पण त्या डगमगल्या नाहीत. पती बाबासाहेब आंबेडकर परदेशात शिकायला गेल्यावर त्या एकट्या घर चालवत होत्या. घर चालवण्यासाठी तिने शेण गोवऱ्या वेचल्या. बॅरिस्टर पतीची पत्नी शेण गोवऱ्या गोळा करते असे लोक नावे ठेवतील म्हणून त्या पहाटे लवकर उठून शेण गोवऱ्या गोळा करत. आयुष्यभर काबाड कष्ट करून त्यांचे शरीर पोखरून गेले होते. त्यामुळे त्या आजारी पडल्या. जानेवारी १९३५ पासून आजार वाढत गेला. मे १९३५ ला त्यांचा आजार विकोपाला गेला. बाबासाहेबांनी सर्व नामांकित डॉक्टरांना पाचारण केले. मात्र त्यांचे शरीर औषधोपचारांना प्रतिसाद देत नव्हते. बाबासाहेब त्यांना फळांचा ज्यूस, चहा, कॉफी पाजत. मात्र त्यांच्या तब्येतीत सुधारणा होत नव्हती. अखेर २७ मे १९३५ रोजी रमाईची प्राणज्योत मावळली. सर्व परिसर आकांतात बुडाले. बाबासाहेबांना हे दुःख पचवणे अवघड गेले. ते रमाईच्या पार्थिवाशेजारी बसून ढसाढसा रडले. जवळ जवळ तीस वर्षे हिमालयासारख्या महामानवाला धैर्याने व प्रेमाने साथ देणारी हिमालयाची सावली सोडून गेल्याने बाबासाहेब एकाकी पडले. हिमालयाची सावली बनलेल्या त्यागमूर्ती माता रमाई यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# गण गण गणात बोते !

बुलढाणा जिल्ह्यातील श्रीक्षेत्र शेगाव हे विदर्भातील पंढरी म्हणून ओळखले जाते. जवळपास ३२ वर्षे श्री गजानन महाराजांनी या परिसरात असंख्य भाविक भक्तांना मार्गदर्शन केले. साक्षात्कार घडवला. ते सिद्ध योगी सत्पुरुष होते. त्यांच्या तोंडी नेहमी ''गण गण गणात बोते'' हा मंत्र होता. गण म्हणजे- जीव, जीवात्मा. गण म्हणजे- शिव किंवा शिवात्मा. गणात म्हणजे- हृदयात. बोते म्हणजे पहा बघा.( हे जीवा स्वतःच्या हृदयात शिवाला परमेश्वराला बघ.)

|| अनंत कोटी ब्रम्हांडनायक महाराजाधिराज योगीराज परब्रम्ह सचिदानंद भक्तप्रतिपालक शेगाव निवासी समर्थ सद्गुरू श्री गजानन महाराज की जय|| म्हणून आपण त्यांचा जय जयकार करतो तेच श्री गजानन महाराज, शेगाव येथे (शके.१८००) २३ फेब्रुवारी १८७८ रोजी देविदास पातुरकर यांच्या घराच्या बाहेर उष्ट्या पत्रावळी टाकल्या होत्या, या पत्रावळी वरील अन्नाचे कण ते वेचून खात होते. आणि गाई,जनावरांना पिण्यासाठी ठेवलेले पाणी ते प्यायले. त्यावेळी बंकटलाल अग्रवाल यांच्या दृष्टीस ते पडले. हा दिवस होता, माघ वद्य सप्तमी. आणि म्हणूनच दासगणू महाराज यांनी पोथी मध्ये तसा उल्लेख केला आहे- माघ वद्य सप्तमी दिनी शेगावात प्रगटोनी उष्ट्या पत्रावळी निमित्त विदेहत्व तव हो प्रकट...

देहात असताना लाखो भाविकांना त्यांनी मार्गदर्शन केले. भक्तीने शक्ती कशी निर्माण होते, हा भक्ती मार्ग दाखवला. तसेच समाधी घेतल्यानंतरही त्यांनी असंख्य भाविकांना दर्शन दिले, तसेच त्यांच्या मनोकामना ही पूर्ण केल्यात. आणि म्हणूनच आज शेगांवला रोज हजारोने भाविक दर्शनासाठी रांगेत उभे असतात आणि तेथील महाप्रसादाचा लाभ घेत असतात. दर्शन आणि महाप्रसाद मिळावा म्हणून भाविकांची अलोट गर्दी गुरुवार शनिवार रविवारी मोठ्या प्रमाणावर असते.राज्य परराज्यातील भाविक प्रकट दिन, समाधी दिन, राम नवमी, महाशिवरात्र अशा विशेष दिवशी लाखोच्या संख्येने येत असतात आणि त्या पुण्यभूमीला स्पर्श करीत असतात. अगदी दर्शन मिळाले नाही तरी कळसाचे दर्शन घेऊन समाधान आणि आनंद मिळवतात.

श्री संत गजानन महाराजांच्या अनेक लीला आहेत. श्री गजानन विजय ग्रंथात दासगणू महाराजांनी त्या नमूद केलेल्या आहेत. अनेक भक्त या पोथीचे मंदिरात किंवा घरीही पारायणे करतात. आणि त्यातूनच त्यांना खूप चांगले अनुभव येतात. आत्मिक समाधान मिळते.

काम, क्रोध,लोभ मोह, मत्सर, व अहंकार यांनी वेढलेल्या माणसाला चिंता आणि विवंचनापासून मुक्ती मिळवण्याकरीता योग्य मार्गदर्शन मिळते. ईश्वराच्या आराधनेतून मानवाला सन्मार्गावर आणण्याचे महान कार्य संत करीत असतात. अर्थातच ते गजानन महाराजांनी केले आहे. ह्याचा अनुभव वेळोवेळी भाविकांना येतोच. गोविंद महाराज टाकळीकर हे शेगांवातील मोटे यांच्या श्री महादेवाच्या मंदिरात कीर्तन करीत असताना त्यांना श्री गजानन महाराज हे सिध्दपुरुष आहेत हे जाणवले. महाराजांनी त्यांच्या व्द्राड घोड्याला शांत केले. महाराजांच्या आज्ञेवरून पितांबराने नाल्यात तुंबा बुडवून पाणी आणले. आणि आश्चर्य म्हणजे तुंब्यातील पाणी स्वच्छ झाले होते.जानकीराम सोनाराकडे विस्तवाची मागणी केल्यावर सोनाराचे मुलांने नकार दिला. तेव्हा श्री महाराजांनी विस्तवाविना चिलीम पेटवली. अक्षयतृतीयेच्या दिवशी जानकीरामच्या घरी आलेल्या अतिथींच्या पानात वाढलेल्या चिचवणीत अळ्या आढळल्याने सर्व अतिथी पानावरून उठून गेले.

श्री गजानन महाराजांना चिलीम ओढण्यासाठी विस्तव न दिल्याने ही घटना घडली हे जाणून जानकीरामने आपली चूक कबूल केली व महाराजांची क्षमा मागितली व लगेच चिंचवणीतील आळ्या नाहीशा झाल्या.अकोली, अडगांव जवळ कोरड्या विहिरीत पाणी निर्माण करून भास्कर पाटील आणि गावकऱ्यांना महाराजांनी थक्क केले. बंकटलालने कणसे खाण्यासाठी महाराजांना आणि काही गावकऱ्यांना मळ्यात नेले होते. कणसे भाजण्यासाठी आग पेटविल्यामुळे मधमाशा पोळयातून बाहेर पडल्याने सगळ्यांनी धूम ठोकली. मात्र महाराज शांतपणे त्याच जागी बसले. शरीराला यत्किंचितही इजा झाली नाही. हरी पाटलांसारख्या श्रेष्ठ कुस्तीगिराच्या शक्तीचे महाराजांनी गर्वहरण केले. मारुती मंदिरात पाटलाच्या मुलांनी पाठीवर उसाचा मार दिला तरी महाराजांनी हातानी रस काढला आणि सर्वांना प्यायला दिला. महाराजांच्या आशीर्वादाने अनेक वर्षे संतती नसणाऱ्या खंडू पाटलाला पुत्ररत्न प्राप्त झाले. जानरावाचा आजार महाराजांचे तीर्थ घेऊन करून बरा झाला, तर कारंजाच्या लक्ष्मण घुडेंनी महाराजांनी दिलेला आंबा खाल्यावर त्यांची व्याधी दूर झाली .प्लेगची साथ आली असताना प्लेगची लागण झालेल्या पुंडलीक भोकरेच्या काखेत महाराजांनी आपला अंगठा लावताच सुधारणा व्हायला लागली आणि पुंडलीक दोन दिवसात बरा झाला. पुंडलीक भोकरे सारख्या निस्सिम सेवक भक्ताला आपल्या पादुका दिल्या. बाळापूरला समर्थ रामदास परम भक्त बाळकृष्ण आणि पुतळाबाईना श्रींनी समर्थांच्या स्वरूपात दर्शन दिले. अमरावतीच्या गणेशआप्पा नावाच्या गरीब भक्तास महाराजांनी त्याच्या घरी जाऊन त्याला भेट दिली. पंढरपूरला बापुना काळेंना आषाढी एकादशीच्या दिवशी विठ्ठलाचे रूप धारण करून दर्शन घडवले.


सोमवती अमावस्येला काही भक्तांसमवेत श्री महाराज नर्मदास्नानासाठी व ओंकारेश्वर दर्शनासाठी गेले होते. नर्मदेच्या जलप्रवासात नावेत पाणी शिरले. तेव्हा महाराजांच्या कृपेने नर्मदेने एका कोळिणीचे रूप धारण करून नाव काठास लावली व त्यांना वाचविले. बंडू तात्याला गुप्त धनाची वर्दी देऊन त्याला आत्महत्या करण्यापासून परावृत्त केले. श्रींनी सुकलालच्या व्दाड गाईला शांत केले, ब्रह्मगिरी पंडित आपले ज्ञान पाजळायला लागल्यावर पेटलेल्या पलंगावर बसून महाराजांनी गोसाव्यास त्याच पलंगावर बसायला सांगितले. भयभीत झालेल्या ब्रह्मगिरीचे गर्वहरण झाले. शिवजयंतीच्या प्रीत्यर्थ भरवलेल्या सभेत लोकमान्य टिळक आणि श्री गजानन महाराज एकत्र आले. त्या सभेत महाराजांनी असे भाकीत वर्तवले की लोकमान्यांना कारावास भोगावा लागेल आणि प्रत्यक्षात खरंच लोकमान्यांना मंडालेच्या तुरूंगात जावे लागले. तेथे 'गितारहस्य' हा ग्रंथ लिहिला गेला.

या सर्व घटनाव्यतिरीक्त कुष्ठरोग बरा होणे, भाकरी प्रसादाने महान कामगिरी होणे. स्त्रियांच्या डब्यातून रेल्वेप्रवास करणे, मृत कुत्रा जिवंत होणे,परमहंस रुपात दर्शन देणे, अशा लिलांव्दारे महाराजांची थोरवी सर्वांना जाणवली होती.

श्री गजाननविजय ग्रंथाचा अध्याय भक्तिपूर्वक वाचून त्याची प्रचिती अनेक भक्त वाचकांस आली आहे, त्याप्रमाणे त्याचा फायदा होतो.....तो असा....

अध्याय १- निराशा, मन:शांती, कर्जमुक्ती, नवीन उपक्रमाची सुरुवात,अध्याय २ कुटुंबातील व्यथा आणि अडचणी,अध्याय ३- दुसर्याचे मन जाणतेपणी किंवा अजाणतेपणी दुखावल्या गेले असेल तर, कुणी जवळचे आजारी असेल आणि डॉक्टरांनी हात टेकले असतील तर,

अध्याय ४- जीवनातील दुख आणि समस्या कमी




करण्यासाठी,अध्याय ५- दुष्काळ, पाण्याची समस्या, तहान लागलेली असेल व पाणि जवळ नसेल तर , गेलेली संपत्ती परत येईल, जीवनात सकारात्मक बदल होईल,अध्याय ६-चांगले विश्वासू मित्र मिळतील, चांगल्या वाईट मधील फरक कळेल,अध्याय ७- निरर्थक अभिमान आणि अहंकार दूर होईल, इच्छुकांना संतान प्राप्ती होईल,अध्याय ८- कायदे विषयक समस्या दूर होतील आणि कोर्ट केसेस मध्ये विजय मिळेल, अहंकारी व्यक्तींचा अहंकार दूर होईल.अध्याय ९- हट्टी दुराग्रही मित्रांचा प्रभाव कमी होईल शत्रूंचा नाश होईल, चुकांची दुरुस्ती होईल किंवा त्यांचा परिणाम कमी होईल, महाराजांचे कुठ्ल्या तरी स्वरुपात किंवा स्वप्नात दर्शन होईल ( जर वार्धक्यामुळे किंवा आजारामुळे शेगावला तुम्ही जाऊ शकत नसाल )अध्याय १० -आपल्या विरोधात कटकारस्थान करणाऱ्याची शक्ती- प्रभाव कमी करण्यासाठी आजारपणातून लवकर ठीक होण्यासाठी,अध्याय ११- ध्येयप्राप्ती आणि अन्याय दूर होऊन न्याय मिळावा ह्यासाठी, स्वरक्षण होण्यासाठी, अपघात किंवा संकटातून वाचलो असल्यास महाराजांचे आभार मानण्यासाठी,अध्याय १२- आपल्या धंद्यात, उद्योगात, शेतीत चांगले उत्पादन, धनधान्य उत्पन्न होण्यासाठी, चांगल्या कार्यात यशप्राप्तीसाठी,अध्याय १३- कर्करोग अथवा तत्सम रोगांपासून मुक्तीसाठी, महापूर, वादळ, अग्नी इत्यादि नैसर्गिक आपत्ती- संकटापासून रक्षण होण्यासाठी, त्याचा प्रभाव कमी होण्यासाठी,अध्याय १४- अचानक सांपत्तिक-आर्थिक हानी झाली असल्यास, अनभिज्ञ संकटांपासून रक्षणा साठी, नदी-पाण्याच्या धोक्यापासून मुक्ती,अध्याय १५-आपल्या कार्यक्षेत्रात स्वतःची ओळख आणि भरपूर प्रसिद्धीसाठी

काम क्रोध मत्सर लोभ आदि पासून दूर राहण्यासाठी नोकरी मिळवण्यासाठी, प्रमोशन मिळण्यासाठी, पगार वाढीसाठी असहनशील व्यक्तींनी सहनशीलता अंगी येण्यासाठी,अध्याय १६- खूप मोठे ध्येय प्राप्त करण्यासाठी अति तीव्र डोकेदुखीचा त्रास होत असल्यास,

अध्याय १७- खोट्या-चुकीच्या आरोपातून मुक्तता दुसर्याकडून मत्सर आणि तत्सम संकटांपासून मुक्ती,अध्याय १८- खोट्या आरोपातून मुक्तता. तीर्थ अंगारा गेऊन ह्या अध्यायाचे वाचन केल्यास शारीरिक व्याधी दूर होतील.इष्ट देवतेचे दर्शन होईल,अध्याय १९- विवाह योग्य मुलामुलींना मनायोग्य जीवनसाथी मिळेल, स्वकष्ट व स्वसामर्थ्यावर विश्वास असणाऱ्या भक्तांना काही कारणाने प्रमोशन मिळत नसेल प्रगती होत नसेल तर त्यांची प्रगती होईल,अध्याय २०- विवाहित जीवनात सफलता मिळेल, उद्योग धंद्यात झालेले नुकसान भरून निघेल, प्रकृती स्वास्थ्य लाभेल,अध्याय २१-

मनःशांती, आरोग्य, सुखसमृद्धी आणि मानसिक समाधानासाठी वाचावा. एकविसावा अध्याय हा कळसाध्याय म्हणतात तो संपूर्ण पोथीचे सार आहे. गजानन विजय ग्रंथाचे पारायण साधारणपणे दशमी- एकादशी- द्वादशी- या तिथीला करतात. गुरुपुष्यामृत योगावर एक दिवसीय पारायण करणे अतिशय फलदायी ठरते. वर्षातून एकदा तरी शेगावला जाऊन श्री महाराजांचे दर्शन घ्यावे, तसेच वर्षभरात गजानन विजय ग्रंथाचा एक पाठ तरी करावा, महिन्यात गजानन प्रार्थना स्तोत्र तरी वाचावे, दर गुरुवारी गजानन बावन्नी म्हणावी. महाराजांना झुणका, भाकर, ठेचा, कांदा, अंबाडीची भाजी याचा नैवेद्य प्रिय आहे तो दाखवावा.

आज अनेक ठिकाणी गजानन महाराजांची मंदिरातून उपासना कार्य सुरू असते. गजानन महाराज शेगाव संस्थानाचे श्री त्रंबकेश्वर, श्री ओंकारेश्वर, आळंदी, पंढरपूर, याठिकाणी मंदिरे व धर्मशाळा आहेत. तसेच महाराष्ट्रात पुसद, नागपूर, पुणे, जळगाव, भुसावळ,एरंडोल, मुंबई, छ.संभाजी नगर,नासिक, गोळेगाव, जन्मस्थान संस्थान म्हणून ओळखले जाणारे मु.पो. थळ- तालुका मोताळा जिल्हा बुलढाणा, मध्य प्रदेशात इंदोर, भोपाळ, ठिकाणी मंदिरे आहेत. अजूनही असंख्य ठिकाणी मंदिर आहेत.परदेशातही अनेक ठिकाणी मंदिर आहेत.

ऋषिपंचमीला श्रीमहाराजांनी समाधि घेतली त्यावेळी भक्तजनांना आपल्या दुःखाचा आवेग आवरणे खूप कठीण होते. महाराजांनी त्यांना धीर देऊन सांगितले... तुम्ही यत्किंचितही दुःख करू नका. तुम्हाला सांभाळण्या साठी मी येथेच आहे, आणि तुमचा विसर मला पडणे कधीच शक्य नाही. मी गेलो आहे असं समजू नका, आणि कधी भक्तित अंतर करू नका. मला विसरू नका. मी येथेच आहे...

दुःख न करावे यत्किंचित। आम्ही आहो येथे स्थित।
तुम्हा सांभाळण्याप्रती सत्य। तुमचा विसर पडणे नसे।।
मी गेलो ऐसे मानू नका । भक्तीत अंतर करू नका ।
कदा मजलागी विसरू नका। मी आहे येथेच।।
ऐसे भाषण करुन । योगें रोधिला असे प्राण ।
दिला मस्तकी ठेवून । त्या महात्म्या पुरुषाने ।।

श्री गजानन महाराज संस्थान.शेगांवचे वतीने अनेक सामाजिक सेवा, शैक्षणिक, आरोग्यविषयक, धार्मिक सेवाकार्य, अव्याहतपणे सुरू आहे. प्रासंगिक उद्भवणाऱ्या अडीअडचणीत मोठ्या प्रमाणावर आर्थिक मदतही केली जाते. संस्थानात असणारे सेवक निस्वार्थीपणे, कुठल्याही प्रकारचे प्रलोभनाला बळी न पडता आपले कार्य महाराजांचे चरणी अर्पण करतोय या भावनेने करत असतात. भक्तांसाठी निवास व वाहनाची सोय संस्थानच्या वतीने केली आहे,स्वच्छता आहे, अतिशय शिस्तबद्ध वातावरण आहे. तसेच संस्थानाचा पारदर्शी व्यवहार वाखाणण्यासारखा आहे.

महराष्ट्रात, तसेच मध्यप्रदेशात, परदेशातही लंडन. अमेरिकेत काही ठिकाणी गजानन महाराजांचा प्रगट दिन भक्ती भावाने साजरा केला जातो. आपण सर्वांनी आपल्या परीने महाराजांच्या चरणी आपली सेवा रुजू करत जावी.श्री गजानन विजय ग्रंथाचे पारायण करून मनःशांती मिळावावी.महाराजांचा आशिर्वाद घ्यावा. तूर्त एवढेच- श्री गजानन जय गजानन ।

गण गण गणात बोते ।।

**दिलीप देशपांडे**
**जामनेर. जिल्हा जळगाव.**
**मोबा.८९९९५६६९१७**

# श्री संत गजानन महाराज अद्भुत दैवी शक्ती

श्री संत गजानन महाराजांची महिमा अपरंपार आहे ही बाब सर्वांनाच ग्यात आहे.त्यामुळेच त्यांना ब्रम्हांडनायक राजाधिराज योगीराज असे संबोधले जाते.कारण त्यांची महिमा संपूर्ण ब्रम्हांडात प्रचलित असल्याचे दर्शविते. आज जगाच्या पाठीवर कुठेही गेलो तर आपल्या लक्षात येईल की भारतात महाराष्ट्राला संतांची भूमी म्हणून ओळखली जाते. कारण महाराष्ट्रात अनेक थोर संत,महात्मे झालेत त्यातलेच संत गजानन महाराज आहेत.आपल्याला गजानन महाराजांचे अनेक चमत्कार दिसून येतात. त्याचप्रमाणे संपूर्ण भारतात शांततेचे प्रतिक म्हणून शेगावचे गजानन महाराजांचे मंदिर व तेथील परिसर प्रसिद्ध आहे. संत गजानन महाराज माघ वद्य ७ शके १८००(दिनांक २३ फेब्रुवारी १८७८) रोजी बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव येथे तारूण्याअवस्थेत प्रगत झालेत.आज संपूर्ण भारतात श्री संत गजानन महाराजांमुळे महाराष्ट्रातील शेगाव हे गाव प्रसिध्दीस आले.साधू देविदास पातूरकरांच्या मठाबाहेर पडलेल्या उष्ट्या पत्राळीतील अन्नाचे कण वेचून खात होते व गाईगुरांकरीता पिण्यासाठी ठेवलेले पाणी पिऊन निघून गेले.ते पुढे बार्शी येथील ब्रम्हनिष्ठ श्रीगोविंद महाराज टाकळीकर यांचे शेगावी महादेवाच्या मंदिरात कीर्तन झाले. त्याप्रसंगी टाकळीकरांच्या बेफाम असलेल्या घोड्यांच्या चौपायांत श्री गजानन महाराज हे ब्राह्मानंदी निमग्न होऊन निजलेले आढळले परंतु तुफान घोडा शांत झाला. अशाप्रकारे तुफान घोड्याला गजानन महाराजांनी शांत केले.तत्काळ गोविंदमहाराजांनी संत गजानन महाराजांची योग्यता ओळखुन भक्तीभावाने पूजा केली व त्यांची महती शेगाव निवासी लोकांना सांगितली. तेव्हापासुनच संत श्री गजानन महाराजांची प्रसिद्धी झाली.यानंतर महाराजांचे अनेक चमत्कार लोकांना दिसून आले. बंकटलाल अग्रवाल यांना गजानन महाराज प्रथमच दिसले असता ''गण गण गणात बोते'' असे उच्चारत त्यांचे भजन नेहमीच सुरू असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यामुळे त्यांना गजानन महाराज ही अद्भुत शक्ती असल्याचे लक्षात आले व गण गण गणात बोते हा जाप सर्वांच्याच हृदयात बसला व गजानन महाराजांची महीमा संपूर्ण शेगावी पसरली.कारण गजानन महाराज ही दैवी शक्ती होती आणि आहे. गजानन महाराजांचे अनेक चमत्कार आपल्याला वेगवेगळ्या ठिकाणी आणि वेगवेगळ्या रूपात पहायला मिळतात.महाराजांच्या तीर्थानेच जानराव देशमुख नावाच्या गृहस्थ मरणोन्मुख स्थितीतुन बरे झाले.अनेक भक्तांना साक्षात पांडुरंगाचे दर्शन गजानन महाराजांनी घडविले.गजानन महाराज हे दिगंबर वृत्तीतील सिध्दकोटीला पोहचलेले महान संत होते. त्यांची दिनचर्या अशा पध्दतीची होती की वाटेल ते खावे, कोठेही पडुन रहावे व कोठेही संचार करावा अशा पध्दतीने ते रहात असे.एकेवेळी तर एका स्त्रीने मिर्चीचा वाटलेला मोठा गोळा खायला दिला तो गोळा त्यांनी मोठ्या आनंदाने खाल्ला जनुकाय पेढे-बर्फी खातात याप्रमाणे खाल्ला व लोटाभर पाणी पिऊन तृप्त झाले गण गण गणात बोते असे अहर्निश भजन उच्चारत निघून गेले.गजानन महाराजांच्या मुखातून नेहमीच ''गण गण गणात बोते'' या शब्दांचे उच्चारण व्हायचे त्यामुळे संपूर्ण भक्तगण श्री संत गजानन महाराज म्हणुन संबोधु लागले.गजानन महाराजांची अपार महिमा पाहून लोक त्यांना बहुमोल वस्त्रे, अलंकार,पैसे, खाद्य पदार्थ अर्पण करीत.परंतु हे सर्वच तेथेच टाकून निघून जात असे. मुख्यत्वेकरून भक्तांना व जनतेला गजानन महाराजांच्या सहवासाने मन:शांति मिळे व त्यांच्या ईश्वरलिलेमुळे सर्व भक्तगण प्रसन्न रहात. आजही महाराष्ट्रासह देशातील अनेक भागात श्री संत गजानन महाराजांची पुजाअर्चना मोठ्या भक्तिभावाने व उत्साहाने साजरी केली जाते.त्याच अनुषंगाने दरवर्षी माघ कृष्णपक्ष सप्तमीला श्री संत गजानन महाराजांचा प्रगट दिवस मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात येतो.यावर्षी माघ कृष्णपक्ष सप्तमीला दिनांक ८ फेब्रुवारीला संपूर्ण महाराष्ट्रात मोठ्या उत्साहाने गजानन महाराजांचा १४८ वा प्रगट दिवस साजरा होत आहे.दरवर्षी विठ्ठलाच्या दर्शनासाठी शेगाव वरून संत गजानन महाराजांची पालखी जात असते व पालखी सोहळा मोठ्या उत्साहाने साजरा होतो.कारण गजानन महाराजांनी विठ्ठल रूपी अनेकांना दर्शन दिले आहे.दररोज शेगावला हजारोंच्या संख्येने वेगवेगळ्या भागातुन भाविक श्री संत गजानन महाराजांच्या दर्शनासाठी येतात. त्याचप्रमाणे याठिकाणी दररोज मोठ्या प्रमाणात महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते. कारण महाराष्ट्रासह अनेक राज्यातुन महाराजांचे दर्शन करण्यासाठी मोठा जनसमुदाय येत असतो अशा प्रकारे श्री संत गजानन महाराजांची लीला अपरंपार असल्याचे आपल्याला दिसुन येते.महाराष्ट्रात घरोघरी गजानन महाराजांची पुजाअर्चना करून भक्तीभावाने संत गजानन महाराजांचा गजर करतात व आपली मनोकामना पूर्ण करतात. त्याचप्रमाणे प्रगट दिनाच्या निमित्ताने अनेक गावांत,शहरात मोठ्या प्रमाणात भजण, किर्तन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते व आपल्याला सर्वत्र संत गजानन महाराजांचा गजर ऐकायला मिळतो.संत गजानन महाराज हे महान संत होऊन गेले त्यामुळे त्यांच्या प्रगट दिनाच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण होणे गरजेचे आहे.कारण दिवसेंदिवस जंगलसंपदा नष्ट होतांना आपण पहातो. परंतु प्रगट दिनाच्या निमित्ताने फ ुल-नाही-फुलांची- पाकळी म्हणून सर्वांकडून वृक्षारोपण व्हायला हवे.कारण जंगल तोडीमुळे संपूर्ण निसर्गाचे संतुलन डगमगतांना दिसत आहे व हे सर्व आपण उघड्या डोळ्यांनी पाहत आहोत. याचाच परिणाम आपल्यालाच नाही तर संपूर्ण जीवसृष्टीला भोगावा लागतो आहे.आपण निसर्गाचे संतुलन व्यवस्थित ठेवले नाही तर सुनामी, भूकंप,वनवालागने, समुद्राची पातळी वाढणे,अती थंडी,अती उष्णता,अती पाऊस,भुस्खणन याला मोठ्या प्रमाणात उफान येवु शकते व यामुळे मानवास,पशु-पक्षी, जीवजंतू यांची मोठी हानी होवू शकते.याकरीता आज निसर्गाला वाचविण्यासाठी वृक्षलागवड ही काळाची गरज आहे.आपण व संपूर्ण भक्तगणांनी श्री संत गजानन महाराजांच्या प्रगट दिनाच्या निमित्ताने वृक्षलागवड केली तर निसर्ग प्रफुल्लित राहिल व प्रत्येक झाडांच्या पानात,फुलात, फळात आपल्याला गजानन महाराजांचे दर्शन अवश्य होईल.कारण गजानन महाराजांचे संपूर्ण जीवन हे झाडांच्याच सानिध्यात रहाले आहे.वृक्षलागवडीमुळे गुरांना चारा व संपूर्ण जीवसृष्टीला ऑक्सिजन व सावली मिळेल. यातच आपल्या साक्षात संत गजानन महाराज अवश्य दिसून येईल व आपण केलेल्या कार्याचे सार्थक अवश्य दिसून येईल.त्यामुळे भक्तांना आग्रहाची विनंती आहे की प्रगट दिनाच्या निमित्ताने जास्तीत जास्त वृक्षारोपण व्हावे या दृष्टिकोनातून पाऊल उचलण्याची नितांत गरज आहे.श्री संत गजानन महाराजांच्या १४८ व्या प्रगट दिनानिमित्त कोटी कोटी प्रणाम!जय गजानन महाराज!

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# नार्को टेस्ट करून सत्य बाहेर येऊ द्या; अमोल खुणेचा अर्ज न्यायालयात सादर करा

## मनोज जरांगे पाटील यांची पोलीस अधीक्षकाकडे मागणी

**जालना । प्रतिनिधी -** माझ्या घातपाताच्या कथित कटप्रकरणात संशयित आरोपी अमोल खुणे याने स्वतःहून नार्को टेस्टची मागणी करणारा अर्ज दिला आहे. त्यामुळे माझ्यासह धनंजय मुंडे, अमोल खुणे आणि इतर मिळून पाच जणांची नार्को टेस्ट करून ''दूध का दूध, पाणी का पाणी'' होऊ द्या, अशी मागणी मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी जालना जिल्ह्याचे पोलीस अधीक्षकांकडे केली आहे.

अमोल खुणेने दिलेला नार्को टेस्ट करण्याचा अर्ज तात्काळ मंजूर करून तो न्यायालयासमोर सादर करावा, अशी ठाम मागणी जरांगे यांनी केली. या संदर्भात त्यांनी पोलीस अधीक्षकांची भेट घेतली. यावेळी बोलताना जरांगे यांनी गंभीर आरोप करत म्हटले की, ''अमोल खुणे हा काही धुतल्या तांदळाचा नाही. अमोल खुणेच्या



खांद्यावर बंदूक ठेवून धनंजय मुंडेंनी माझ्या घातपाताचा कट रचला आहे,'' असा दावा त्यांनी केला. आपल्या जीवाला धोका असल्याचे मान्य करत असतानाच, ''माझी सध्याची सुरक्षा व्यवस्था काढून घ्या,'' अशी मागणीही जरांगे यांनी पोलीस अधीक्षकांकडे केल्याचे सांगितले. ''माझा घातपात करायचा असेल तर परळीच्या छक्क्याला मोकळं मैदान पाहिजे, म्हणूनच माझी सुरक्षा काढून घेण्याची मागणी केली,'' असे वक्तव्यही त्यांनी केले. दरम्यान, ''तू मला मारायला ये, क्षत्रिय मराठा काय असतो ते दाखवतो,'' अशा स्वरूपाच्या व्हायरल कॉल रेकॉर्डिंगवर प्रतिक्रिया देताना जरांगे यांनी नाव न घेता धनंजय मुंडेंना इशारा दिला. ''तू एका बापाचा असशील तर मला मारायला ये; तुझे बोटंही परत जाऊ देणार नाही,'' असे विधान त्यांनी केले. तसेच, या घातपात प्रकरणातील सर्व आरोपींचा जामीन रद्द करून त्यांची सखोल पुनर्तपासणी करण्यात यावी, अशी मागणीही जरांगे यांनी यावेळी केली आहे.

# स्वच्छता व पाणीपुरवठा कर्मचाऱ्यांचे राज्यभर काम बंद आंदोलन

## दुसऱ्या दिवशीही सुरु; विविध संघटनांचा पाठिंबा



**जालना । प्रतिनिधी -** स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा२ आणि जल जीवन मिशन अंतर्गत महाराष्ट्राला देशपातळीवर नावलौकिक मिळवून देणाऱ्या स्वच्छता व पाणीपुरवठा विभागातील कर्मचाऱ्यांचे मागील पाच महिन्यांपासून मानधन प्रलंबित असल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. या पार्श्वभूमीवर राज्यभरातील कर्मचारी काम बंद आंदोलनावर गेले असून आज आंदोलनाचा दुसरा दिवस आहे. या आंदोलनास महाराष्ट्र विकास सेवा अधिकारी वर्ग१ संघटना तसेच कास्ट्राईब कर्मचारी महासंघ, महाराष्ट्र राज्य जालना जिल्हा शाखेने लेखी पाठिंबा दिला आहे. शासनाने कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर तात्काळ निर्णय घ्यावा, अशी मागणी संघटनांच्या वतीने करण्यात आली आहे.

प्रलंबित मानधन, सेवा सुरक्षा आणि भविष्यात नियमित मानधन वितरणाबाबत लेखी हमी मिळेपर्यंत दिनांक ४ ते ८ फेब्रुवारी दरम्यान जिल्हास्तरावर आंदोलन सुरू राहणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील स्वच्छता व पाणीपुरवठा विभागाशी संबंधित अनेक कामे ठप्प झाली आहेत.

ऑक्टोबर २०२५ ते जानेवारी २०२६ या कालावधीतील मानधन अद्याप न मिळाल्याने कर्मचाऱ्यांच्या कुटुंबांवर गंभीर आर्थिक संकट ओढवले आहे. घरभाडे, मुलांचे शिक्षण, वैद्यकीय खर्च तसेच दैनंदिन जीवनावश्यक खर्च भागवणे कठीण झाले असतानाही हे कर्मचारी ग्रामपंचायत, तालुका व जिल्हा स्तरावर नियमितपणे सेवा देत आहेत.

या आंदोलनास महाराष्ट्र विकास सेवा राजपत्रित अधिकारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी लिंबाजी बारगिरे, सचिव तथा सहाय्यक गटविकास अधिकारी समीर जाधव, तसेच कास्ट्राईब कर्मचारी महासंघ महाराष्ट्र राज्य शाखेचे जिल्हाध्यक्ष विनोद भगत व जिल्हा उपाध्यक्ष गोविंद इंगळे यांनी लेखी पाठिंबा दिला आहे. शासनाने कर्मचाऱ्यांच्या मागण्या तात्काळ मान्य कराव्यात, अन्यथा आगामी काळात आंदोलनात सक्रिय सहभाग घेण्याचा इशारा संघटनांनी दिला आहे.

# अविष्कार मध्ये जेईएसच्या योगेश उरदुखे यांचे यश

## फंगल स्पोर डिटेक्टर उपकरणाची राज्यस्तरावर दखल

**जालना । प्रतिनिधी -** येथील जेईएस महाविद्यालयाचे पी.एचडी. संशोधक विद्यार्थी श्री. योगेश उरदुखे यांनी राज्य स्तरावर बाजी मारली आहे. परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ येथे आयोजित १८ व्या महाराष्ट्र राज्यस्तरीय आंतर-विद्यापीठ संशोधन परिषद अविष्कार मध्ये त्यांनी सादर केलेल्या पोर्टेबल फंगल स्पोर डिटेक्शन डिव्हाइस या उपकरणाला ''प्राईज फॉर इनोव्हेशन'' देऊन गौरविण्यात आले. शेती आणि पशुसंवर्धन या श्रेणीत त्यांनी हे नाविन्यपूर्ण उपकरण सादर केले होते. वनस्पतींवरील बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव ओळखण्यासाठी हे उपकरण अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. या संशोधन परिषदेत संपूर्ण महाराष्ट्रातील २६ विद्यापीठांमधून विद्यार्थी सहभागी झाले होते.



मार्गदर्शकांचे प्रोत्साहन: या संशोधनासाठी त्यांना, वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. उमेश मोगले, प्राध्यापक डॉ. गणेश कुलकर्णी, अविष्कार कमिटीचे समन्वयक डॉ. राजेश सरकटे यांचे सहकार्य लाभले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा. पुरुषोत्तमजी बगडिया, सचिव श्री. श्रीनिवासजी भक्कड, व प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांनी त्यांचे अभिनंदन केले. तसेच कर्मचारी व पीएचडी संशोधक विद्यार्थ्यांनी योगेश उरदुखे यांचे विशेष अभिनंदन केले आहे.

यशस्वी विद्यार्थ्याचा प्रेरणादायी संदेश: या यशाबद्दल बोलताना योगेश उरदुखे म्हणाले की, ''हे यश केवळ माझे नसून संपूर्ण विभागाचे आहे. माझे मार्गदर्शक व वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. उमेश मोगले, प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, प्राध्यापक डॉ. गणेश कुलकर्णी, अविष्कार कमिटीचे समन्वयक व सर्व सहकारी यांच्या सहकार्यामुळेच मी हे मॉडेल राज्यस्तरापर्यंत नेऊ शकलो. संशोधनाच्या प्रवासात अनेकदा अडथळे येतात, मात्र विद्यार्थ्यांनी हार न मानता सातत्य ठेवले पाहिजे. आजच्या तरुणांनी केवळ पदवी मिळवण्यापुरते मर्यादित न राहता, समाजाच्या आणि विशेषतः शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी विज्ञानाचा वापर करावा. आऊट ऑफ द बॉक्स विचार करून सातत्याने प्रयोग केल्यास यश नक्कीच मिळते. जिद्द आणि चिकाटी असेल तर ग्रामीण भागातील विद्यार्थीही जागतिक दर्जाचे संशोधन करू शकतात.''

# जिल्हा कारागृहात आरोग्य तपासणी शिबीर संपन्न

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्हा कारागृहातील अधिकारी, कर्मचाऱ्यांसह बंदीची गुरुवार दि.५ फेब्रुवारी २०२६ रोजी शिबिरात आरोग्य तपासणी करण्यात आली. शिबीराचे आयोजन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.राजेंद्र पाटील,डॉ.प्रदीप कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली एकुण ७५ जणांची आरोग्य तपासणी करुन औषधी वाटप करण्यात आली. याप्रसंगी अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. राजेंद्र गाडेकर, कारागृह अधिक्षक प्रविण विभांडीत, वैद्यकिय अधिक्षक डॉ. प्रज्ञा कुलकर्णी, डॉ. ओम ढाकणे यांच्यासह कारागृहातील कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती. असे कळविले आहे.



# स्वामी विवेकानंद पतसंस्थेचे कार्य प्रेरणादायी; भविष्यात संयुक्त विद्यमाने उपक्रम राबवू - आशिमा मित्तल

## स्वामी विवेकानंद यांच्या जीवनचरित्रावरील प्रश्नमंजुषा परीक्षेचे बक्षीस वितरण उत्साहात



**जालना । प्रतिनिधी -** स्वामी विवेकानंद यांचा 'उठा, जागे व्हा आणि ध्येय प्राप्त होईपर्यंत थांबू नका' हा विचार प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या जीवनात आत्मसात केला पाहिजे. प्रत्येकामध्ये अफाट शक्ती दडलेली आहे. ती ओळखून आत्मविश्वासाने ध्येयपूर्तीसाठी सातत्याने प्रयत्न करावेत. स्वामी विवेकानंद नागरी सहकारी पतसंस्थेचे शैक्षणिक व सामाजिक कार्य अत्यंत प्रेरणादायी असून, भविष्यात प्रशासन व संस्थेच्या संयुक्त विद्यमाने विविध उपक्रम राबविण्यात येतील, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांनी केले.

स्वामी विवेकानंद नागरी सहकारी पतसंस्थेच्यावतीने बुधवार दि. ४ फेब्रुवारी रोजी आएमए हॉलमध्ये आयोजित स्वामी विवेकानंद यांच्या जीवनचरित्रावर आधारित प्रश्नमंजुषा परीक्षेच्या बक्षीस वितरण समारंभात त्या बोलत होत्या. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उद्योगपती अनिल गोयल, सहाय्यक निबंधक परमेश्वर वरखडे, देवगिरी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. उल्हास शिऊरकर तर व्यासपीठावर पतसंस्थेचे अध्यक्ष अभय कुलकर्णी, उपाध्यक्ष कैलास पवार, सचिव प्रसन्ना जाफराबादकर, संचालक नाना जोशी व हरीश शिरसाट यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते प्रथम व द्वितीय क्रमांक प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना गोल्ड मेडल, सिल्वर मेडल व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. मार्गदर्शक शिक्षकांना स्मृतीचिन्ह प्रदान करण्यात येऊन सर्वाधिक विद्यार्थी सहभाग नोंदविणाऱ्या तीन शाळांना विशेष पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

यावेळी डॉ. उल्हास शिऊरकर यांनी विद्यार्थ्यांना स्वामी विवेकानंद यांच्या जीवनमूल्यांवर आधारित प्रेरणादायी मार्गदर्शन करत ध्येय निश्चिती व यशस्वी जीवनाचा मार्ग विविध उदाहरणांतून स्पष्ट केला. प्रास्ताविकात अध्यक्ष अभय कुलकर्णी यांनी पतसंस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांची माहिती दिली. विद्यार्थ्यांसाठी प्रश्नमंजुषा, महिलांसाठी आरोग्य शिबिरे, वृक्षारोपण, महिला सक्षमीकरण, कोरोना काळात लसीकरण शिबिरे, २०१२ च्या दुष्काळात ग्रामीण भागात पाण्याच्या टाक्यांचे वितरण तसेच ३० महिलांना शाश्वत रोजगार उपलब्ध करून दिल्याचे कार्य त्यांनी नमूद केले. पतसंस्थेच्यावतीने गेल्या १० वर्षांपासून स्वामी विवेकानंद यांच्या जीवन व विचारांवर आधारित प्रश्नमंजुषा परीक्षा सातत्याने आयोजित केली जात आहे. यावर्षी जिल्ह्यातील ८० शाळांच्या एकूण २३०० विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पवन जोशी यांनी केले तर उपस्थितांचे आभार पतसंस्थेचे सचिव प्रसन्ना जाफराबादकर यांनी मानले. या कार्यक्रमाला पालक, विद्यार्थी व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पीएम श्री जिल्हा परिषद प्रशाला इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ



परतूर । प्रतिनिधी - भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा पीएम श्री जिल्हा परिषद प्रशालेत दि.०५/०२/२०२६, रोजी इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.यावेळी प्रमुख मार्गदर्शक, विशाल पतंगे. सहयोगी प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग आणि संशोधन केंद्र, पिपल्स कॉलेज नांदेड.कार्यक्रमाचे अध्यक्ष, गणेश राठोड. मुख्याध्यापक जि.प.प्रशाला.प्रमुख पाहुणे शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष,द या काटे.शालेय व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष, रमाकांत बरीदे. शिक्षण तज्ज्ञ, भगवानराव मोरे.यांच्या शुभ हस्ते कार्यक्रमाला सुरुवात झाली.याप्रसंगी पतंगे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत असताना ते म्हणाले सर्वप्रथम जिल्हा परिषदेच्या शाळांची परिस्थिती ही सगळ्या महाराष्ट्रभर महाराष्ट्राच्या चिंतेचा विषय आहे.आणि त्यावेळी महाराष्ट्राच्या जिल्हा परिषद शाळांसाठीच एक आदर्श मॉडेल काय असू शकत याची शाळा म्हणजे तुमची जिल्हा परिषद प्रशाला परतूर ही आहे. जिल्हा परिषद वर विश्वास ठेवायचा की नाही अशी परिस्थिती समाजात आहे परंतु या शाळेच्या सगळ्या यशाचं श्रेय हे तुमच्या पालकांना जातं तुमच्या आई-वडिलांना जातं ज्यांनी इथं प्रवेश दिला. विद्यार्थ्यांनो आपण आपल्या क्षमता ओळखा आणि त्या क्षमता ओळखून अभ्यासक्रम निवडा निवडताना फार महत्त्वाचा अशा स्वरूपाचा विचार हा आपल्याला करावा लागतो. आणि नववीचे आठवीचे पुढच्या वर्षी त्याच्या पुढच्या वर्षी इथं आज पर्यंत काय होता त्या रस्त्याला कुठलाच दुसरा फाटा फुटलेला नव्हता आज आपण दहावीला आलो दहावीच्या पुढे एकदा पास झालेल्या कोणाला सायन्स मध्ये जायचे आहे कोणाला इंजिनियर व्हायचे, वकील व्हायचंय,पॉलिटेक्निक करायचंय त्याच्यामुळे आता खरा पेज तुमच्या पुढे आहे की नेमकं कोणत्या दिशेला जायचं कोणत्या मार्गाला जायचं हे तुम्हाला माहिती पाहिजे अशाप्रकारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. इयत्ता नववीचे सर्व विद्यार्थी व शिक्षक वृंद उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्र संचलन नववीच्या विद्यार्थिनींनी केले.

# परतूर मुख्याध्यिकारी नगर परिषद यांना नगरसेवकांचे निवेदन



**परतूर । प्रतिनिधी -** परतूर येथील नगरसेवकांचे दि.०६/०२/२०२६ रोजी निवेदनाद्वारे शहरातील विविध समस्यांबाबत निवेदन देण्यात आले.पवित्र रमजान महिना व रमाई जयंती, छत्रपती शिवाजी महाराज जयंती, निमित्ताने शहरामध्ये स्वच्छता, विद्युत पुरवठा, पाणी पुरवठा सुरळीत करण्यात यावा.सल्ग महिनाभर रमजान , महापुरुषांचे जयंती उत्सव साजरे करनार असुन या कालावधीत शहर स्वच्छता, घंटागाडी , नाली सफाई , विद्युतीकरण व पाणी पुरवठा सुरळीत करण्यात यावी.अनेकवेळा सुचना देऊनही सदरील कार्य होत नाही करिता जातीने लक्ष घालून आपण शहराची पाहणी करावी.आमची मागणी, स्वच्छता करणे, पाणी पुरवठा मोटारी दुरुस्त करणे, शहरात विद्युत लाईटची व्यवस्था करणे, घंटागाडी किमान आठ ते नऊ सुरू करण्यात याव्या, सफाई कामगार यांना पगार मिळावा, यावेळी, अकील काजी.बाबुराव हिवाळे.राजेश खंडेलवाल.अफसर शेख,योगी प्रधान.तयबा फातेमा.रज्जाक कुरेशी.कदिर कुरेशी.तौफीक शेख.संतोस हिवाळे.यासर्व नगरसेवक यांच्या स्वाक्षऱ्या निवेदनावर आहेत.

# राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल मार्फत जिल्हयात रासायनिक आपत्तीवरील टेबल-टॉप एक्सरसाइज आणि मॉकड्रिल संपन्न





**जालना । प्रतिनिधी -** जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, यांचे निर्दे शानुसार व निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांचे मार्गदर्शनानुसार दिनांक ०५ फेब्रुवारी २०२६ रोजी जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील अंकुशनगर येथे स्थित ''कर्मयोगी अंकुशराव टोपे सहकारी साखर कारखाना'' या रासायनिक कारखान्यात राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल मार्फत जिल्हयात रासायनिक आपत्तीवरील टेबल-टॉप एक्सरसाइज आणि मॉकड्रिल आयोजीत करण्यात आली होती.

सदर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मा. श्री. राजेश टोपे, माजी मंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण) हे होते. कार्यक्रमाची सुरुवात विविध शासकीय अधिकारी तसेच राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलच्या पथकाच्या परिचयाने करण्यात आली. त्यानंतर पथकाद्वारे पॉवरपॉइंट प्रेझेंटेशन सादरीकरण करण्यात आले, ज्यामध्ये संबंधित सर्व घटकांच्या भूमिका व जबाबदाऱ्या स्पष्ट करण्यात आल्या.

या मॉक ड्रिलमध्ये इथेनॉल टाकी व पाईपलाईनमधून गळती होऊन कारखाना परिसरात आग लागल्याचा काल्पनिक प्रसंग गृहीत धरून सराव करण्यात आला. यावेळी पथकाने इथेनॉलच्या मटेरियल सेफ्टी डेटा शीट बाबत माहिती दिली तसेच प्रत्यक्ष आपत्कालीन व्यवस्थापनाचे प्रात्यक्षिक सादर केले. या मॉक ड्रिलचा उद्देश आपत्कालीन परिस्थितीत जनजागृती करणे तसेच त्रुटी विश्लेषण करणे हा होता. मॉक ड्रिल यशस्वीरीत्या पूर्ण झाल्यानंतर पथकाने बचाव कार्यासाठी वापरण्यात येणाऱ्या विविध उपकरणे व साधनांची माहिती दिली.

या कार्यक्रमास औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय अंतर्गत श्री. उमाकांत पारधी, उपविभागीय अधिकारी, अंबड, श्री. विजय चव्हाण, तहसीलदार, अंबड, श्री. पी. व्ही. सुरसे, सह संचालक, श्री. नंदकिशोर देशमुख, उपसंचालक, श्री.दिपक काजळकर, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, जालना, डॉ. दयानंद कांबळे, तालुका आरोग्य अधिकारी, श्री. आकाश तळवडकर, सहाय्यक संचालक, सौ. शीतल गायकवाड, सहाय्यक संचालक यांचेसह सर्व संबंधीत विभागप्रमुख तसेच कंपनीचे सहकारी उपस्थित होते.

# छत्रपती संभाजीनगर आयएमएतर्फे ब्रँड अँम्बेसेडर डॉ. कैलाश सचदेव यांचा सन्मान




**जालना । प्रतिनिधी -** इंडियन मेडिकल असोसिएशन छत्रपती संभाजीनगरच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या आयएमए हेल्दी मॅरेथॉन मध्ये ब्रँड अँम्बेसेडर म्हणून महत्त्वाची भूमिका बजावल्याबद्दल डॉ. कैलाश सचदेव यांचा विशेष सन्मान करण्यात आला. या उपक्रमाद्वारे ओबेसिटी मुक्त आणि सदृढ भारत घडवण्याचा संदेश देण्यात आला.

छत्रपती संभाजीनगरमधील आयएमए कार्यालयाजवळ मॅरेथॉनचे उद्घाटन घाटी रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. सुक्रे यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून करण्यात आले. छत्रपती संभाजीनगरमधील सुमारे ४५० धावपटूंनी ३ किमी, ५ किमी आणि १० किमी गटात धावून या मोहिमेत सहभाग घेतला.

याप्रसंगी मॅरेथॉनचे ब्रँड अँम्बेसेडर म्हणून आरोग्य जनजागृतीसाठी दिलेल्या योगदानाबद्दल डॉ. कैलाश सचदेव यांना आयएमए छत्रपती संभाजीनगरच्यावतीने गौरवण्यात आले. या मॅरेथॉनच्या माध्यमातून केवळ धावणेच नव्हे, तर मधुमेह आणि लठ्ठपणा सारख्या आजारांपासून दूर राहण्यासाठी सक्रिय जीवनशैलीचा अवलंब करण्याचे आवाहन करण्यात आले. मॅरेथॉनच्या यशस्वीतेसाठी आयएमएचे अध्यक्ष डॉ. अनुप टाकळकर, सचिव डॉ. योगेश लक्कास, डॉ. शिवाजी पोले, डॉ. यशवंत गाडे, डॉ. जितेंद्र कुलकर्णी आणि डॉ. उज्वला दहिफळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# गोर सेना जालना शहरध्यक्षपदी संदीप चव्हाण यांची नियुक्ती



**जालना । प्रतिनिधी -** तालुक्यातील पाहेगाव तांडा येथील रहिवासी संदीप सुदामा चव्हाण यांची गोरसेना जालना शहरध्यक्षपदी नियुक्ती झाली आहे.हि नियुक्ती राष्ट्रीय अध्यक्ष संदेश चव्हाण यांनी केली आहे. याप्रसंगी गोरसेना राष्ट्रीय अध्यक्ष संदेश चव्हाण, लहु चव्हाण सरपंच, अंजेय चव्हाण, श्रीकांत राठोड,शिवाजी चव्हान, विकास चव्हाण, मिथुन चव्हाण, अमोल पवार,पंकज चव्हाण, करण चव्हाण, बंडु राठोड व ईतर काही गोरसेनेचे जालना जिल्हा पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हि नियुक्ती झाल्याबद्दल संदीप चव्हाण यांना अनेक मान्यवरांकडून, मित्रमंडळी कडून शुभेच्छाचा वर्षाव होत आहे. या नियुक्तीबद्दल संदीप चव्हाण यांचे हार्दिक-हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीस खूप खूप शुभेच्छा.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.